**ठळक बातम्या**

- भारत जगासोबत स्पर्धा करण्यासाठी सज्ज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं राज्यसभेत प्रतिपादन /राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव संसदेत आवाजी मतदानानं मंजूर

- राज्यात जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराची सांगता

- नवी मुंबई महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौरपदी भाजपा उमेदवारांची बिनविरोध निवड

- मुंबई - पुणे एक्सप्रेस वे वरच्या ३३ तासांच्या कोंडीचा पुरवठ्यावर परिणाम

**आणि**

- महिला क्रिकेटमधे प्रीमीयर लीगच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम लढत

**<><><><><>**

भारत जगासोबत स्पर्धा करण्यासाठी सज्ज असून जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे आत्मविश्वासानं वाटचाल करत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज राज्यसभेत, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभारप्रस्तावाला उत्तर देत होते. भारत सुधारणा आणि परिवर्तनाचं धोरण घेऊन वाटचाल करत आहे, गेल्या काही दिवसांत भारतानं नऊ मोठे व्यापारी करार केले असून यात अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबतच्या करारांचा समावेश आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

- **- - होल्ड बाईट मोदी - - -**

देशाच्या कारखानदारी परिसंस्थेची पुनर्बांधणी सुरू असून सरकार उद्योजकांना प्रोत्साहन देत आहे, असं मोदी म्हणाले. अनेक देशांसाठी भारत हा विश्वासू भागीदार बनला आहे, देशातल्या तरुणांसाठी जगाची बाजारपेठ खुली झाली असून रोजगाराच्या असंख्य संधी तयार झाल्या आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिभाषणात देशाच्या वेगवान प्रगतीचा आढावा घेतला, तसंच विकसित भारताच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीची नोंद घेतल्याचंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

प्रधानमंत्र्यांच्या भाषणाच्या सुरुवातीला विरोधी पक्षांनी सरकारविरोधी जोरदार घोषणाबाजी केली. आणि त्यानंतर सभात्याग केला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव आज राज्यसभेत आवाजी मतदानानं मंजूर झाला.

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव आज लोकसभेनंही आवाजी मतदानानं मंजूर केला. राष्ट्रपतींनी २८ जानेवारीला संसदेच्या दोन्ही सभागृहाला संबोधित केलं होतं. आभारप्रस्ताव मंजुरीचा प्रस्ताव भाजपा खासदार सर्बानंद सोनोवाल यांनी मांडला त्याला तेजस्वी सूर्या यांनी अनुमोदन दिलं.

विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब होण्याआधी तीनवेळा तहकूब झालं होतं.

सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्ष सदस्यांच्या कालच्या वर्तनावर नापसंती व्यक्त केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभारप्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देणार होते, मात्र विरोधी पक्षांचे सदस्य प्रधानमंत्र्यांच्या आसनासमोर येऊन गोंधळ करणार असल्याची माहिती आपल्याला मिळाल्यामुळे आपणच प्रधानमंत्र्यांना सभागृहात न येण्याचा सल्ला दिल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा प्रचार आज संपला आहे. येत्या शनिवारी, सात तारखेला मतदान होणार असून, नऊ तारखेला मतमोजणी होईल. या निवडणुकांसाठी मतदारांना आपलं नाव आणि मतदान केंद्र सहज शोधता यावं, यासाठी राज्य निवडणूक आयोगानं मताधिकार हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिलं आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदी भाजपाच्या सुजाता सूरज पाटील यांची तर उपमहापौर पदी भाजपाचे दशरथ सीताराम भगत यांची बिनविरोध निवड झाली आहे. दोन्ही पदांसाठी शिवसेनेच्या उमेदवारांनीही अर्ज भरले होते, मात्र त्यांनी माघार घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दोन नगरसेवक, मनसेचा एक नगरसेवक, आणि एक

अपक्ष नगरसेवक यांनीही भाजपाला पाठिंबा दिला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीसाठी आज महापालिका मुख्यालयात विशेष सभा घेण्यात आली.

चंद्रपूर महानगरपालिकेत महापौरपदासाठी १०, तर उपमहापौर पदासाठी ६ अर्ज दाखल झाले आहेत. या महानगरपालिकेत काँग्रेसचे २७ नगरसेवक आहेत. मात्र आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या समर्थकांमधे संघर्ष असल्याचं चित्र होतं. आता हा तिढा सुटला असून उपमहापौरपदासाठी वडेट्टीवार समर्थक वसंत देशमुख यांनी अर्ज भरल्याचं वडेट्टीवार यांनी नागपुरात वार्ताहरांना सांगितलं. काँग्रेसच्या गटनेतेपदी राजेश अडूर यांची नियुक्ती झाल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या १५ आमदारांचं शिष्टमंडळ येत्या १५ फेब्रुवारीपासून लंडनच्या अभ्यासदौऱ्यावर जाणार आहे. विधिमंडळ सचिवालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय की विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या नेतृत्वाखाली जाणाऱ्या या पथकात बाबासाहेब देशमुख, परिणय फुके, विक्रम पाचपुते, नमिता मुंदडा, निरंजन डावखरे, स्नेहा दुबे, विक्रांत पाटील, अमित गोरखे, विक्रम काळे, विश्वजीत कदम, वरुण सरदेसाई, मनिषा कायंदे, सिमित वानखेडे आणि योगेश टिळेकर या सर्व पक्षीय आमदारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

मुंबई - पुणे द्रुतगती मार्गावर मुंबईकडे येणारी वाहतूक तब्बल ३३ तासानंतर पुन्हा सुरळीत सुरु झाली. खंडाळा घाटात मंगळवारी मुंबईकडे येणाऱ्या मार्गावर आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील वायू घेऊन जाणारा एक टँकर उलटल्यानं वाहतूक खोळंबली होती. यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहनात अडकलेले प्रवासी, महिला आणि लहान मुले यांची गैरसोय झाली. यावेळी दूध आणि भाजीपाल्याची वाहतूक करणारे ट्रक देखील अडकून पडल्यानं जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम झाला.

एसटी महामंडळालाही या वाहतूक कोंडीचा फटका बसला. दोन्ही शहरांदरम्यान धावणाऱ्या शिवनेरी आणि साध्या गाड्यांच्या अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागल्यानं एसटीच्या एकट्या पुणे विभागाचं एक दिवसात सुमारे ५० लाख रुपयांचं नुकसान झालं.
मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

या वाहतूक कोंडीच्या काळात प्रवाशांकडून वसूल केलेला टोल सरकारनं परत करावा, अशी मागणी  मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे.

<><><><><>

महिला  क्रिकेटमधे प्रीमीयर लीगच्या विजेतेपदासाठी आज गतविजेते दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम लढत होणार आहे. बडोदा इथं थोड्याच वेळात, साडेसात वाजता सामना सुरु होईल. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यंदाच्या महिला प्रीमीयर लीग करता भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं  सुमारे १० कोटी रुपयांची बक्षिसं घोषित केली आहेत.

<><><><><>

क्रिकेटमध्ये १९ वर्षांखालच्या युवकांच्या विश्वचषक स्पर्धेत उद्या भारत आणि इंग्लंड यांच्यात अंतिम सामना होणार आहे. झिम्बाब्वेमध्ये हरारे इथल्या मैदानावर होणारा हा सामना दुपारी १ वाजता सुरू होईल. हरारे इथे काल झालेल्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा सात गडी राखून पराभव केला आणि अंतिम फेरी गाठली. तर इंग्लंडने बुलावायो इथे झालेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा २७ धावांनी पराभव केला. भारतीय संघ या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला आहे. तसंच, आतापर्यंत सर्वाधिक ५ वेळा विश्वचषक जिंकण्याचा विक्रमही भारताच्याच नावावर आहे.

<><><><><>

परीक्षा पे चर्चा हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रम येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता प्रसारित होणार आहे.  तणावमुक्त वातावरणात परीक्षा देण्याचं महत्त्व तसंच मनाची शांतता, आत्मविश्वास वाढवणं आणि आव्हानांवर मात करणं यासाठीचे उपाय याविषयी प्रधानमंत्री विद्यार्थ्यांशी बोलले आहेत. यावर्षी देवमोगरा, कोइमतूर, रायपूर, गुवाहाटी आणि नवी दिल्लीतल्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.

<><><><><>

कुख्यात गुन्हेगार अबू सलेमचा पॅरोलसाठीचा अर्ज आज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणी अबू सलेम सध्या २५ वर्षांची कैद भोगत

आहे. आपल्या भावाच्या निधनानंतर उत्तरप्रदेशातल्या मूळ गावी जाण्यासाठी त्याने पॅरोल मागितला होता. मात्र पॅरोल दरम्यान एस्कॉर्टसाठीचा खर्च आपण देऊ शकणार नाही असं त्यानं सांगितल्यामुळं न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या पीठाने पॅरोल नाकारला.

**<><><><><>**

वाशीम इथं आज जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ‘संपूर्णता अभियान २.०’चा जिल्हास्तरीय प्रारंभ झाला. आकांक्षी जिल्हा आणि तालुका कार्यक्रमांतर्गत हे अभियान राबवलं जात आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या कपिलधारा देवस्थानात आज पोलिसांनी एका अल्पवयीन मुलीचा विवाह रोखला. गुप्त माहितीच्या आधारावर सामाजिक संस्थेच्या मदतीनं पोलिसांनी ही कारवाई केली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात उत्तर कोकणात किमान तापमानात लक्षणीय वाढ तर मध्य महाराष्ट्रात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**